देशोन्नती

# महिला वसतिगृहात सायबर सुरक्षा जागृती मार्गदर्शन

**अकोला** ■ स्थानिक जुने शहर येथील मातृ मंदिर महिला वसतिगृहात सायबर क्राइम आणि सुरक्षाबाबत मार्गदर्शनाचा कार्यक्रम पार पडला. सायबर क्राइम कशाप्रकारे घडतात, सोशल मीडिया- फेसबुक, इंस्टाग्रामच्या माध्यमातून ऑनलाइन फसवणूक कशी होते याबाबत अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या शीतल साखरे आणि नेहा टेरे यांनी वसतिगृहातील विद्यार्थिनींना उपयोगी आणि उत्कृष्ट मार्गदर्शन केले. मुलींनी ऑनलाइन फसवणुकीपासून कसे दूर राहावे, कोणती काळजी घ्यावी याविषयी सविस्तर माहिती सांगितली.

हा मार्गदर्शनाचा कार्यक्रम क्विक हिल फाउंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या सहयोगाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला होता. यावेळी, वसतिगृहाच्या संचालिका प्रा. डॉ. प्रियाकुमारी धाबे यांनी मोबाइल आणि सोशल मीडियाचा वापर कमीत कमी आणि योग्य पद्धतीने करण्याचे आवाहन विद्यार्थिनींना केले आणि तशा प्रकारची शपथ दिली. सायबर सुरक्षा टिप्स असलेले माहितीपत्रक वाटप करण्यात आले. यावेळी श्रद्धा तेलंग आणि वसतिगृहातील सर्व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

